**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 03rd January 2019**

**Article regarding Uttung 2018-19**

# आनंद देऊ चला

## पोदार कॉलेजमध्ये ‘उत्तुंग’








राघवेंद्र महाबळेश्वरकर, पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com


स्वतः मजा करण्याबरोबरच दुसऱ्यांनाही आनंद कसा देता येईल या विचारातून पोदार कॉलेजच्या एनएसएस युनिटतर्फे ‘उत्तुंग’ हा फेस्टिव्हल साजरा केला जातो. यंदा दहावं वर्ष असून, हा फेस्टिव्हल ४ आणि ५ जानेवारी या दोन दिवसांत साजरा होतोय. तंत्रज्ञानानं जोडलं गेलेलं जग, जगाचं झालेलं एक कुटुंब अशी या फेस्टिव्हलची यंदाची थीम आहे. या थीमनुसार काही स्पर्धा होणार आहेत. ‘महाराष्ट्र टाइम्स’ या फेस्टिव्हलचा मीडिया पार्टनर आहे.

दोन दिवस चालणाऱ्या ‘उत्तुंग’ फेस्टमध्ये पहिल्या दिवशी, म्हणजे चार जानेवारीला विविध इंटरकॉलेज स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. पथनाट्य, वक्तृत्व, शॉर्टफिल्म अशा स्पर्धांचा यात प्रामुख्यानं समावेश आहे. विविध सामाजिक समस्यांवर विद्यार्थ्यांना या स्पर्धांच्या माध्यमातून व्यक्त व्हायचं आहे. पाच जानेवारीला अनाथाश्रमातल्या मुलांसाठी पोदार एनएसएस युनिटचे विद्यार्थी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहेत. तसंच या मुलांना त्यांच्यातले कलागुण दाखवायची संधी ‘उत्तुंग’नं यावर्षी उपलब्ध करून दिली आहे. सामाजिक भान ठेवून अनेक उपक्रमांचं आयोजन ‘उत्तुंग’मध्ये केलं जातं. यावर्षीही उत्तुंग अंतर्गत कॉलेजमध्ये रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. या शिबिरात शिक्षक, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.